2019-2020

Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

June-2020

**SPECIAL ISSUE- CCXXXII (232)**

# *Challenges in the 21st Century & Need of Gandhian Ideology*



**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
**Director**
**Aadhar Social Research & Development Training Institute Amravati**

**Editor:**
**Dr. V.L.Bhangdia**
**Principal**
**Smt.Kesharbai Lahoti Mahavidyalaya, Amaravati Dist. Amravati.**

**This Journal is indexed in :**
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

**Aadhar Publications**

| | | |
|---|---|---|
| 23 | महात्मा गांधीजींच्या विचारातील काही निवडक संकल्पना<br>डॉ. संतोष खंडारे | 78 |
| 24 | राष्ट्रबांधणी, राष्ट्रवाद आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या संदर्भात महात्मा गांधीच्या विचारांची आवश्यकता<br>डॉ. पी.एल. अंबोरे | 83 |
| 25 | म.गांधीजींच्या विचारधारेत "अध्यात्माचे स्वरूप" आबासाहेब माणिकराव देशमुख | 86 |
| 26 | महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार ग्राम स्वराज्याचा आधार<br>प्रा. डॉ. दिपक शृंगारे | 88 |
| 27 | राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या स्वराज्यासमोरील २१ व्या शतकातील आव्हाने व उपाय योजना. प्रा.डॉ.उमेश आर.धुमाळे | 92 |
| 28 | महात्मा गांधींची मुलोद्योगी शिक्षण योजना आणि वर्तमान शिक्षणप्रणाली<br>डॉ. कविता तातेड | 95 |
| 29 | महात्मा गांधीचे विचार : ग्रामिण आणि कृषी विकास कु. स्वाती रूपराव पिंगळे | 100 |
| 30 | महात्मा गांधी आणि राष्ट्रीय एकात्मता - एक मूल्य सुनिल रामदास खडसे | 102 |
| 31 | महात्मा गांधींच्या तत्त्वविचारातील जीवनमूल्यांची आवश्यकता प्रा. डॉ.स्मिता सूर्यवंशी | 107 |
| 32 | पर्यावरणाविषयी महात्मा गांधीजी यांचा दृष्टीकोन प्रा.अनिल चिंतामण सावळे | 109 |
| 33 | महात्मा गांधीचे राजकीय, सामाजिक आणि आर्थिक सुधारणाविषयक विचार<br>भावना मनोज तायडे | 112 |
| 34 | महीला सबलीकरणाविषयी म. गांधीजींचा दृष्टीकोन प्रा. कु. पल्लवी धनंजय इंगोले | 119 |
| 35 | महात्मा गांधीजींचा सामाजिक न्याय प्रा. डॉ. संजय जे. भगत | 123 |
| 36 | महात्मा गांधीचे शैक्षणिक तत्वज्ञान व आजची परिस्थिती डॉ. वनिता ना काळे | 126 |
| 37 | भारतीय राष्ट्रीय आंदोलनात महात्मा गांधीजींचे योगदान<br>डॉ. पी. जी. राठोड | 130 |
| 38 | राष्ट्रीयत्व व राष्ट्रीय एकात्मता संबंधी गांधीजींचे विचार<br>डॉ. मालिनी मोहन वडतकर | 134 |
| 39 | महात्मा गांधी यांचे राष्ट्रीय एकात्मते संबंधीचे विचार<br>प्रा. डॉ. श्रीराम खाडे | 142 |
| 40 | व्यक्तिमत्व विकासात महात्मा गांधीजींच्या सत्य आणि अहिंसातत्वाचे योगदान<br>प्रा.रजनी आनंदराव काळे | 148 |
| 41 | महात्मा गांधींचे स्त्रीविषयक विचार आणि २१ व्या शतकातील स्त्री वास्तव<br>प्रा. सुधीर मा. गोटे | 150 |
| 42 | महात्मा गांधींचे राजकीय, सामाजिक आणि आर्थिक विचार प्रा. ज्योती आर. खोब्रागडे | 153 |
| 43 | महात्मा गांधी आणि महिला सक्षमीकरण प्रा. नीता एस. पाठक | 157 |
| 44 | गांधीजीच्या राष्ट्रवादसंबधीचे विचार : एक विश्लेषणात्मक अध्ययन<br>प्रा. डॉ. रजनीश बांबोळे | 160 |

B.Aadhar' International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
June, 2020

# व्यक्तिमत्व विकासात महात्मा गांधीजींच्या सत्य आणि अहिंसा तत्वाचे योगदान

प्रा.रजनी आनंदराव काळे
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख म.ज्योतिबा फुले महाविद्यालय,अमरावती

**प्रस्तावना**

महात्मा गांधीजींचे व्यक्तिमत्व हे समग्र मानवी जीवनासाठी शिकवण देणारे असेच होते.गांधीजी हे केवळ थोर विचारवंत नव्हते तर ते वैशिष्ट्यपुर्ण असे भाष्यकार सुद्धा होते.त्यांच्या वाणीमुळे संपुर्ण समाज एकत्रित राहत, एकत्रित निर्णय घेत असे.त्यांच्या वाणीचा वागणूकीचा जनसामान्यावर जबरदस्त पगडा होता.याचे मुळकारण म्हणजे महात्मा गांधीजींनी अहिंसा या तत्वाला जीवनात उच्चत्तम स्थान दिले.अहिंसा या तत्वावर आधारलेला मानवी जीवनाचा विधायक मार्ग त्यांनी अंगीकारला होता.त्यांनी जीवन जगत असतांना मानवाच्या समाज जीवनाच्या विविध अंगाचा सत्य व अहिंसा प्रधान दृष्टीने स्विकार केला व त्या पद्धतीने त्यांनी आपले जीवन व्यतित केले.

महात्मा गांधीजींच्या नेतृत्वात दृष्टेपणा होता.त्यांचे दृष्टेपण खालील त्यांच्या मध्ये स्थित असलेल्या तत्त्वावरुन दिसून येते.ते तत्व म्हणजे त्यांचे महात्मेपण, गांधीवादी, सत्य, अहिंसा,सत्याग्रह, प्रेमधर्म, आत्मप्रामान्यवृत्ती, गीता चिंतन, ईश्वर धर्म, नीती,साधनसुचिता, ग्रामस्वराज्य, स्त्रीजीवन, शिक्षण व्यवस्था, अकराव्रते, लोकशाही, प्रार्थना,हरिजन सेवा,शोषणरहीत, समाज जीवन ग्रामोद्योग, चारित्र्य संवर्धन, विधायक कार्य,खादी व हस्तोद्योग इत्यादी अशा विविध आयामामधून गांधीजींच्या दृष्टेपणाचे प्रत्यक्षरित्या दर्शन होते. तसेच त्यांचे व्यक्तिमत्व हे कसे अष्टपैलू होते.याचेही दर्शन आपणास होते.

सदर शोधनिबंधामधून महात्मा गांधीजींच्या सत्य व अहिंसा या व्यक्तिमत्व विकासात काय योगदान आहे यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

गांधीजींची सत्य वअहिंसा ही संकल्पना अतिशय व्यापक स्वरुपाची आहे.तिला अनेक आयाम आहेत.महात्मा गांधीनी मानवी जीवनासाठी सत्य व अहिंसात्मक आयामालाच जीवन जगण्याचा पैलू मानले आहे आणि त्यानुसार आपले जीवन व्यतित केले.संपुर्ण मानव जातीकडे पाहिले असता आपल्याला असे दिसून येतेकी, प्रत्येक मानवहा बनलाच अशा गोष्टीसाठी की स्वतःच्या जून्या सवयीमध्ये बदल करायचा आणि नवीन सवयींचा स्वीकार करायचा म्हणजेच आपले जेषडः रिपू आहेत, वाईट वासना आहेत.या सर्व आंतर इंद्रियावर ताबा मिळविण्यासाठी आणि जे सत्यसुंदर आहे त्याला योग्य स्थान देण्यासाठीच मानवाची निर्मिती झाली आहे.या सर्वांचा आधार म्हणजे मानवाजवळ असलेली सत्य व अहिंसाही वृत्तीच आहे.

महात्मा गांधीजींच्या जीवन शैलीचा अभ्यास करीत असतांना असे दिसते की, त्यांनी आपल्या जीवन प्रवासात सत्य आणि अहिंसा या दोन संयुक्त तत्वानाच आद्य स्थान दिले आहे.सत्य व अहिंसा या तत्वाचा विचार संकुचित न ठेवता त्यांनी व्यापक पद्धतीने या तत्वाचा विचार केला आहे.ते म्हणतात की, मानवी आचारात, विचारात भावनेत, वृत्तीत तसेच सामाजिक वर्तनामध्ये सत्य व अहिंसा हे तत्व मध्यवर्ती साधन बनविले तरच मानवी जीवन आजच्या परिस्थितीत सुरक्षित, स्थिर आणि प्रगतीपथावर व आनंदमय राहू शकेल.आजच्या या तंत्रज्ञानाच्या युगात सत्य व अहिंसा नामक तत्वाची ठायीठायी गरज आहे. ती या बुद्धीप्रधान मानवानी अवलंबिली तरच समाज हा सुदृढ होईल, शांत होईल, आनंदी होईल. आपणच आपले सुख, शांती निर्माण करु शकतो, असा आत्मविश्वास प्रत्येक मानवामध्ये निर्माण होईल.

महात्मा गांधीजी यांच्या विचारांवर टॉलस्टॉय, रस्कीन या महान विचारवंतांचा फार मोठ्या प्रमाणात प्रभाव होता.रस्कीन यांचा ग्रंथ वाचून झाल्यानंतर महात्मागांधीनी सन 1815साली ट्रॅपिस्टांची वसाहत स्थापन केली.ही वसाहत म्हणजे शरीरश्रम,समानता व बंधुभावया तत्वावर वसविलेले एक खेडे होते.या खेड्यात आफ्रिकेतील रहिवाशांना कौशल्यात्मक शिक्षण देण्यासाठी अनेक प्रकारचे व्यवसाय या खेड्यात सुरु होते.या खेड्यातील साधी राहणी, उद्योगशीलता, वैराग्य, शिस्तप्रियता व काळ्या आणि गो-या लोकांना दिली जाणारी समानतेची वागणूक यांचा ही प्रभाव गांधीजींवर पडत.यामुळेते प्रभावित झाले.गांधीजी हे अहिंसात्मक वृत्तीचे होण्यासाठी अशा घटनांचा त्यांच्या व्यक्तिगत जीवनावर प्रभाव होता.त्यातूनच त्यांना मानवतेची सेवा हाच परमेश्वराची उपासना करण्याचा खरा धर्म होय असे ज्ञात झाले. या आफ्रिकेतील मिशन-यांनी गांधीजींना त्यांच्या वर्तनातून दाखवून दिले की निवृत्ती,तत्परता आणि सेवाभावही तत्वे अंगीकारल्या शिवाय मानवी देह पुर्णत्वास जात नाही.तसेचअहिंसा हे तत्व उदात्त असे क्रियात्मक तत्व आहे.अहिंसाही मानवी देहा मध्ये वसलेली परमशक्ती आहे.

20 व्या शतकामध्ये गांधीजी हे सत्य व अहिंसा या तत्वाला धरुन चालणारे एकमेव असे व्यक्तिमत्व होते.दैनंदिन जीवनातील मोठ्यात मोठ्या समस्या सत्य व अहिंसा या तत्वातच असलेल्या क्षमतेव्दारे आपण सोडवू शकतो, असा त्यांचा संपुर्ण विश्वास होता.तत्वज्ञानाच्या या युगात परमाणू सारखे शस्त्र जरी असले तरी या पृथ्वीला दिर्घायु देऊन आश्वस्त करण्यासाठी वर्तमानातील समस्या सोडविण्यासाठी सत्य व अहिंसा या तत्वाचा जास्तीत जास्त उपयोग होतो. या युगात सामान्य जन सत्य व अहिंसा या तत्वाचाच उपयोग करुनच आपले जीवनमान उच्चस्थितीत व सुव्यवस्थित जगू शकतो. कारण हिंसा या तत्वामुळे मनुष्यचे जीवनात अस्थिर होते, अयशस्वी होतो.

महात्मा गांधीजी हे प्रत्येक गोष्टींचा, घटनेचा, विचारांचा, सिद्धातांचा, उपपत्तीचा स्वतः तर्कसुद्ध रितीने विचार करीत असत.कोणाचीही सुचना, मत किंवा विचारते तसाच्या जसा चटकन सत्य व योग्य आहे म्हणून भाबडेपणाने मान्य करीत नसत.गांधीजी स्वतः अनुभवनिष्ठ होते. (Empiricist)आपली स्वतःची प्रतिक्रियाते अत्यंत बारकाईन समजून घेऊन तपासून पाहत असत व स्वतःला निसंशयपणे पटली तरच तीचा अग्रह धरीत असत.विचारसारणी स्विकारायचा त्यांची ही दृष्टी आधुनिक परिभाषेत मांडायची झाल्यास वैज्ञानिक स्वरुपाची अशीच होती.तत्वज्ञानाच्या भाषेत सांगायचे म्हणजेते स्वतः एका अर्थाने स्वतः प्रामाण्यवादी, आत्मप्रामाण्यवादी, अनुभवनिष्ठ असे होते.गांधीजी आध्यात्मिक होते.त्यांना स्वतःला काही ठरवायचे असल्यास तसा आदेश व प्रेरणा त्यांना अंर्तज्ञानाने मिळत असे.सर्व महान पुरुषांची मनोवृत्ती ही स्वतः प्रामाण्यवादी अशीच असते व तिच्यातच त्यांचे मोठेपण अद्वियीत्व विसंबून राहून स्वतःचे मार्ग शोधून स्वतःच्या योजना स्वतःच आखून योग्य व समर्पक निर्णय घेत असत.त्यामुळेच गांधीजीच्या ठिकाणी प्रचंड आत्मविश्वास, हिंमत, धैर्य व जिद्द आली होती.त्यांची अंतःशक्ती हीच त्यांची सहचारिणी होते.

सत्य व अहिंसा हे तत्व प्रसंगानुसार आचारावयाचे तत्व नाही, तर जे निरंतर आपल्याच ठायी असते. अहिंसा या तत्वामुळे मानवी जीवनातच समग्र बदल होतो. सत्य व अहिंसाहे तत्व अंगीकारल्यामुळे मानवी अंतःकरण षडःविकाररहित होते.कारण जोपर्यंत मानवी अंतःकरणातून क्रोधाची भावना उत्पन्न होणे बंद होणार नाही तो पर्यंत सत्य व अहिंसा नामक तत्वाचा स्विकार केल्या जाणार नाही.सत्य व अहिंसेचा परिणाम रेडिअम सारखा होत असतो.रेडिअम जसे सातत्याने आपले काम करीत असते अगदी तसेच सत्य व अहिंसानामक तत्वाचे आहे.सत्य व अहिंसाही तत्व जरी अंशमात्र असली तरी ते सुक्ष्म अदृश्य रितीने परिणाम करीत असते आणि त्यामुळेच सर्व समाज व समाजातील सर्वच प्राणी शुद्ध बीजासारखे बदलून जातात.

सत्य व अहिंसा ही गांधीजींच्या मते शारीरिक सामर्थ्यामधून शक्ती किंवा बळ देत नसते.खरी शक्ती मनःशक्तीतून येत असते.तिला गांधीजी आत्मबळ म्हणतात.स्वतःच्या बळाची निश्चितपणे जाणीव झाली तरच चित्तात क्षमा उपजू शकते.ज्ञानपुर्वक उपजलेल्या क्षमावृत्तीतून आपल्या चित्तात बळाची अशी एक प्रचंड लाट उसळली पाहिजे ज्यायोगे जुलूम करणा-यांना आपल्यावर एका मागूनएक अपमान लादणे शक्य होईल.सत्य व अहिंसा हे असे शस्त्र आहे ते मानवाच्या निरंतर उपयोगी पडते.शस्त्र नसते.तेव्हा त्याला स्वतःच्या आंतरिक बळावरच अवलंबून राहावे लागते.त्यासाठीच अहिंसा नामक तत्वाचा आपण स्विकार केला पाहिजे. जर मनुष्याने अहिंसा नामक तत्वाचा स्विकार केला तर तो धैर्याने जीवनातीले सर्व समस्यांना तोंड देऊ शकतो. आत्मबळ आपोआप व नैसर्गिकपणे जागे होते व त्याना आतून बळ मिळते, विश्वास व उत्साह वाढत जातो.

अशा रितीने सत्य व अहिंसा नामक तत्वाचा जर मानवी आचारणात उपयोग करुन घेतला तर मानव हा अत्यंत क्षमाशील होईल आणि विश्वास निरंतर शांतता प्रस्थापित होईल.तसेच मानवी जीवन सत्य शिव सुंदर होवून जाईल.

**संदर्भ ग्रथ**

1) महात्मा गांधी - अखेरचे पर्व, लेखक - प्यारेलाल प्रकाशक-सौ. शुभा कुळकर्णी, पराग एजन्सीज, नवी राऊतवाडी, अकोला, 30 जाने. 2004.
2) विचार विमर्श - महात्मा गांधी, डॉ. ग.ना. जोशी, अशोक केशव कोठावळे, मजेस्टीक प्रकाशन,फिनिक्स, 3 रा मजला,457 एस.व्ही.पी.एम रोड, मुंबई, 400 004.
3) आत्मकथा - मोहनदास करमचंद गांधी, श. वा. वेलणकर,नियंत्रक पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, मुंबई 400018.
4) गांधी नावाचे महात्मा,रॉय किणीकर, अनिल किणीकर, डायमंड पब्लिकेशन, 1255, सदाशिव पेठ, लेले संकूल, पहिला मजला, निंबाळकर तावली समोर, पुणे411030.
5) गांधी- नकिनी पंडीत प्रकाशन ग्रंथावली, ईंडियन एज्युकेशन सोसायटी म.फुले कन्या शाळा बाबरेकर मार्ग, ऑफ गोखले रोड(3), दादर मुंबई. 400028.